लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

कंट्रक्शन
आमच्याकडे कमर्शियल रेसिडेंशियल बंगलोज अपार्टमेंट दर १६५० चौ. फुटप्रमाणे मटेरियलसह लॉक अँड की प्रोजेक्ट करून दिले जातील. संकल्प इंजीनियर्स
मो. ९३७१५२३९३९

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक ३६ वा | शनिवार, दि. २४ ऑगस्ट २०२४ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

कामिनी गांधी
संस्था, फॅशन डिझायनिंग
सरकारमान्य सर्टिफिकेट
गारमेंट मॅन्यु. अँड फॅशन डिझायनिंग - फर्स्ट ईयर
फॅशन डिझायनिंग अँड फॅशन टेक्नॉलॉजी - सेकंड ईअर
कॉम्प्युटराईज्ड फॅशन डिझायनिंग अँण्ड टेक्नॉलॉजी - थर्ड ईअर
▶ फॅशन ड्रेस डिझायनिंग
▶ फॅशन ब्लाऊज डिझायनिंग ▶ प्रिंसेस ब्लाऊज ▶ अरी वर्क ▶ पार्टीवेअर गाऊन
एका वर्षात कुटुंबातील कमवता सदस्य व्हा.
या... पहा.. शिका..!
३६३, दक्षिण कसबा, युनिक हॉस्पिटल समोर, जुनी फौजदार चावडी, सोलापूर
9850117867, 9096495025

# महाराष्ट्र बंद मागे, महाविकास आघाडी करणार तोंडाला काळ्या फिती बांधून आंदोलन

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** मुंबई उच्च न्यायालयाने राजकीय पक्षाने पुकारलेल्या बंदला बेकायदेशीर म्हटले आहे. याचपार्शवभूमी माध्यमांशी बोलताना अॅड. गुणरत्न सदावर्ते म्हणाले की, न्यायालयाच्या निर्णयानंतर राजकीय पक्षांना बंद करता येत नाही.

यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी शनिवारचा बंद मागे घेण्याचे आवाहन केले आहे. यानंतर आता काँग्रेसने बंद मागे घेणारे असल्याचे स्पष्ट केले आहे. मात्र काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी शनिवारी एक तास काळी पट्टी आणि काळे घेऊन सरकारचा निषेध करणार असल्याचे म्हटले आहे. मात्र यावेळी त्यांनी जनतेने उद्या स्वतःहून बंद केला तर आमचा त्याच्याशी काहीही संबंध राहणार नाही, असेही स्पष्ट केले.



नाना पटोले म्हणाले की, आमचं आता उद्धव ठाकरे आणि जयंत पाटील यांच्याशी बोलणं झालं आहे. आम्ही निर्णय केला आहे की, न्यायालयाचा आदर करून शनिवारी काळा झेंचा आणि तोंडाला काळी पट्टी बांधून सकाळी 11 ते दुपारी 12 वाजेपर्यंत आम्ही पूर्ण महाराष्ट्रात आंदोलन नाही, पण मुस्काटदाबीच्या धोरणाच्या विरोधात शांततेत बसू आणि या सरकारला निषेध करू. आम्ही त्यापद्धतीच्या सूचना संपूर्ण महाराष्ट्रात दिल्या आहेत. न्यायालयाने जो निर्णय दिला आहे, त्याचा विरोध करण्याचं काही कारण नाही, पण शनिवारी काळा झेंडा आणि तोंडाला काळी पट्टी बांधून आम्ही बसू, अशी भूमिका नाना पटोले यांनी स्पष्ट केली.

नाना पटोले यांना प्रश्न विचारण्यात आला की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आरोप केला आही की, विरोधीपक्ष राजकीय पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न करत आहेत. यावर पटोले म्हणाले की, बदलापूरमधील शाळा आमची होती का? त्या ठिकाणी दोन मुलींवर जो अत्याचार झाला, तेव्हा तुमचं सरकार काय झोपलं होत का? मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना राजकारण दिसतं. ते राजकारणासाठी जगतात. समाजासाठी आणि महाराष्ट्रासाठी ते जगत नाहीत. सातत्याने ते आरोप करत आहेत की, राजकीय पोळी. मग तुम्ही काय करत आहात? योजनेच्या प्रसिद्धीसाठी 470 कोटी रुपये खर्च करत आहात, हे राजकार नाही का? जनतेच्या पैशांची उधळपट्टी करून तुम्ही स्वतःच्या राजकीय पोळ्या तुम्ही शेकता आणि महाराष्ट्राची जनता वाऱ्यावर आहे. महाराष्ट्राची जनता असुरक्षित आहे. शाळेत जाणाऱ्या मुली असुरक्षित आहेत. त्याची तुम्हाला काळजी नाही. त्यामुळे न्यायालयाचा आदर करून आम्ही शनिवारी महाराष्ट्रभर एक तास काळा (पान 2 वर..)

## योग्य पद्धतीने पाण्याच्या नियोजन बद्दल समाधानी - खा. धैर्यशील मोहिते पाटील

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** खासदार धैर्यशील मोहिते पाटील व सर्व लोकप्रतिनिधी यांनी टेंभू उपसा सिंचन योजनेच्या प्रगती बाबत व सिंचनाच्या अनुषंगाने योग्य पद्धतीने पाण्याचे नियोजन होत असल्याने समाधान व्यक्त केले.

टेंभू उपसा सिंचन योजनेंतर्गत आटपाडी तालुक्यातील निंबवडे तलावा मधून बंदिस्त पाईपलाईनद्वारे खवासपूर लोटेवाडी व माण नदीमधील बंधाऱ्यांमध्ये पाणी देण्याची मागणी व त्या अनुषंगाने विभागाने कार्यवाही केली.

कार्यकारी संचालक महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे अध्यक्षतेखाली दि.०५/०८/२०२४ रोजी खासदार धैर्यशील मोहिते पाटील माढ़ा लोकसभा मतदारसंघ मधील टेंभू उपसा सिंचन योजनेच्या, विस्तारित टप्पे व सातारा जिल्ह्यातील माण खटाव व सोलापूर जिल्ह्यातील सांगोला लाभक्षेत्रामध्ये, उपसा सिंचन योजनेच्या कामाच्या प्रगती बाबत बैठक पार पडली. या बैठकीच्या वेळी प्रभाकर देशमुख, अभय जगताप, डॉ बाबासाहेब देशमुख, अनिल देसाई व सुरेंद्र गुदगे यांचेसह माण खटाव व सांगोला मतदार संघातील लोकप्रतिनिधी उपस्थित होते.



या बैठकीदरम्यान खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी, सांगोला तालुक्यातील माण नदीमध्ये पाणी सोडण्यात यावे तसेच टेंभू योजनेच्या आटपाडी डाव्या कालवामार्फत निंबवडे तलावाखालील बंदिस्त वितरिकेद्वारे लोटेवाडी खवासपूर व माण नदीवरील बंधाऱ्यांमध्ये पाणी सोडण्याची मागणी केली होती.

यावेळी टेंभू प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता रा.य रेड्डीयार यांनी, सद्यःस्थितीत, पावसाळ्यामध्ये कृष्णा नदीला पुराच्या पाण्यामुळे पातळी वाढलेली असल्याने योजना कार्यान्वित करून, टेंभू उपसा सिंचन योजनेच्या लाभक्षेत्रातील माण खटाव व सांगोला तालुक्यामध्ये पाणी सोडण्यात आल्याचे सांगितले. साधारणपणे १ टीएमसी पुराचे पाणी वापरून दुष्काळी भागातील कमी पर्जन्यमान असलेल्या लाभक्षेत्रामध्ये पाणी देण्याचे नियोजन असल्याचे जलसंपदा विभागाच्या वतीने सांगितले.

त्यानुसार अद्यापपर्यंत ०.५ टीएमसी पाण्याचा वापर करण्यात आला असून अजून १ टीएमसी पूराचे पाणी उचलण्याचे उद्दिष्ट असल्याचे कार्यकारी अभियंता रा.य रेड्डीयार टेंभू उपसा सिंचन प्रकल्प व्यवस्थापन विभाग, ओगलेवाडी यांनी सांगितले.

या बैठकीदरम्यान खासदार धैर्यशील मोहिते पाटील माढा लोकसभा मतदारसंघ, यांनी टेंभू उपसा सिंचन योजनेच्या प्रगती बाबत व विस्तारित टेंभू उपसा सिंचन योजनेच्या प्रगती बाबत आढावा घेतला. तसेच प्रवाही पद्धतीने, ज्या गावांना पाण्याचा लाभ होणार आहे, परंतु सर्वेक्षणामध्ये समाविष्ट नसलेली गावे यांचे फेरसर्वेक्षण करण्यात येऊन, नियोजनामध्ये समाविष्ट करणेबाबतमागणी केली. या मागणीच्या अनुषंगाने गुणाले मुख्य अभियंता जलसंपदा विभाग, पुणे, हरूगडे टेंभू उपसा सिंचन प्रकल्प विभाग क्र.१ सांगली व रासनकर, लघु पाटबंधारे विभाग सांगली यांनी सव्र्हेक्षण करण्यात येऊन, पडताळणी करण्यात येऊन, समाविष्ट नसलेल्या गावांबाबत योग्य त्या उपाययोजना करण्याच्या ग्वाही दिली. खासदार धैर्यशील मोहिते पाटील व उपस्थित सर्व लोकप्रतिनिधी यांनी टेंभू उपसा सिंचन योजनेच्या प्रगती बाबत व सिंचनाच्या अनुषंगाने योग्य पद्धतीने पाण्याचे नियोजन होत असलेने समाधान व्यक्त केले.


## श्री नीळकंठेश्वर मंदिर येथील श्री महादेवाच्या चरणी सोन्यानी बनविलेले त्रिपुंड व चंद्र व गणपती च्या चरणी चांदीचे दागिना अर्पण

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापुर शहरात, पुर्वभाग येथील साखर पैठ येथे "नवसाला पावणारा श्री नीलकंठेश्वर" या नावाने प्रसिद्‌थ असलेले श्री महादेवाचे श्री नीलकंठेश्वर मंदिर आहे.

या मंदिरात वर्षभर व विशेष करुन श्रावण महिन्यात हजारो शिवभक्त मोठया संख्येने उपस्थित राहुन मनोभावे श्री महादेवाचे दर्शन घेतात. तसेच, शिवभक्ताच्या मनातील ईच्छा पुर्ण व्हावा म्हणुन भक्तजण श्री महादेवाच्या चरणी नवस धरतात.

असे मानले जाते की, शुध्द अंतकरणः व मनोभावे प्रार्थना केलेल्या शिवभक्तांचा देवाधिदेव श्री महादेव सर्व मनोकामना पुर्ण करुन शिवभक्तांचा नवस पुर्ण करतात, अशी भक्तांची श्रद्धा आहे.

असेच, एका शिवभक्तांनी नवसाला पावणारा श्री नीलकंठेश्वर भगवान च्या आर्शिवादाने त्यांची मनातील ईच्छा पुर्ण झाल्याने पुर्णपणे 36 ग्रम सोन्यापासुन अतिशय सुबक व आर्कषक पणे बनविलेले त्रिपुंड व चंद्र तसेच श्री गणपतीच्या चरणी 200 ग्रम वजनाचे चांदिचे दागिने अर्पण केली आहे.



## सोलापूरकरांनी अनुभवला ५ लाख रुपये बक्षिसाच्या दहीहंडीचा थरार ! सोनाई फाउंडेशन व स्वयंम शिक्षा फाउंडेशनचा संयुक्त उपक्रम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** वरूणराजाच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर जमलेले गोविंदा, गोविंदा पथकांनी दिलेली ६ थरांपर्यंतची सलामी, श्वास रोखून दहिहंडीकडे खिळलेल्या सर्वांच्या नजरा अन दहीहंडी फोडताच झालेला जल्लोष.... अशा अत्यंत उत्साही अन आनंदमयी वातावरणात सोलापूरकरांनी ५ लाख रुपये बक्षिसाच्या दहीहंडीचा थरार गुरूवारी अनुभवला. ठाणे येथील बाल हनुमान महिला पथक या गोविंदा पथकाने दहीहंडी फोडून ५ लाख रुपयांचे पारितोषिक पटकावले.

श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त सोनाई फाउंडेशन व स्वयंम शिक्षा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जुळे सोलापुरातील भंडारी ग्राउंडवर गुरुवारी या भव्य दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रारंभी आमदार राम सातपुते यांच्या हस्ते आणि श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे अध्यक्ष जन्मेजय भोसले, संयोजक सोनाई फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष युवराज राठोड तसेच स्वयंशिक्षा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सोमनाथ वैद्य यांच्या प्रमुख उपस्थितीत दहीहंडी उत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख अण्णाप्पा सतुबर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव, महेश भंडारी, माजी नगरसेविका संगीता जाधव, अश्विनी चव्हाण, राजश्री चव्हाण, मागास समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष सचिन चव्हाण, शंकर जाधव, माजी सरपंच धर्मराज पुजारी, डॉ. संतोष राठोड, लाला राठोड, दीपक पवार, सिनेअभिनेते संतोष कासे, विजय शाबादी, श्रीकांत डांगे, शिवाजी वाघमोडे, सरपंच सुजाता शास्त्री, बंडू कदम, शाम धुरी, दीपक पवार, मेनका राठोड, वैशाली शहापुरे, विश्वनाथ आमणे, युवराज चव्हाण, राहुल अनंतपुरकर, रसूल पठाण, दयानंद भिमदे, रविकांत कांबळे, चंद्रकांत शहापुरे, पिंटू इरकशेट्टी, अविनाश राठोड, चंद्रकांत चव्हाण, माधुरी डहाळे, सुभाष व्हनमाने, अनिकेत राठोड, मनोजकुमार अलकुंटे, अशोक मसरे, दिनेश बनसोडे, चिदानंद बगले, बाबुराव काळे, बिरप्पा बिराजदार आदी उपस्थित होते.




सिनेअभिनेत्री संस्कृती बालगुडे आणि धनश्री काडगावकर यांचे नृत्य आणि सोलापूरकरांशी संवाद हे या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले. त्यांनी विविध गीतांवर नृत्य सादर करुन रसिकांच्या टाळ्या मिळवल्या. तसेच स्वप्निल रास्ते यांनी दोन्ही अभिनेत्रींना बोलते केले.

महाराष्ट्रातील लोकप्रिय दहिहंडी असलेले संघर्ष प्रतिष्ठान (ठाणे), संस्कृती प्रतिष्ठान (ठाणे), संकल्प प्रतिष्ठान (इंदापूर), शिवाजी नाना गावडे दहिहंडी संघ (बारामती), बाल हनुमान दहिकला उत्सव मंडळ (ठाणे), बाल हनुमान महिला पथक (ठाणे) अशा गोविंदा संघांनी या स्पर्धेत सहभाग घेतला.

सोनाई फाऊंडेशन व स्वयंम शिक्षा फाऊंडेशनच्या या दहीहंडी उत्सवास सोलापूर शहर जिल्ह्यासह ठाणे, मुंबई, बारामती, पुणे येथील गोविंदा पथकदेखील आली होती. बारामती येथील शिवाजी नाना गावडे गोविंदा पथकास एक लाख रुपयांचे तर इंदापूर येथील संकल्प प्रतिष्ठान गोविंदा पथकास ५० हजार रुपयांचे पारितोषिक सोनाई फाऊंडेशन व स्वयंम शिक्षा फाऊंडेशनतर्फे देण्यात आले. हा कार्यक्रम पाहण्यासाठी सोलापूरकरांनी प्रचंड मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

ऐश्वर्या हिबारे आणि पल्लवी पवार यांनी सूत्रसंचालन तर काशिनाथ भतगुणकी यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सोनाई फाउंडेशन आणि स्वयंशिक्षा फाउंडेशनच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

### नागरिकांनी मानले संयोजकांचे आभार

तब्बल ५ लाख रुपयांचे बक्षीस असलेली मोठी दहीहंडी प्रथमच सोलापुरात आयोजित करण्यात आली होती. ही दहीहंडी पाहण्यासाठी हजारो सोलापूरकरांनी प्रचंड गर्दी केली होती. या पहिल्या इतक्या भव्य दहीहंडी उत्सवाच्या आयोजनाबद्दल नागरिकांनी सोनाई फाऊंडेशनचे अध्यक्ष युवराज राठोड आणि स्वयंम शिक्षा फाऊंडेशनचे अध्यक्ष सोमनाथ वैद्य यांचे आभार मानले.

### संस्कृती अन धनश्रीच्या नृत्यासोबत थिरकली तरुणाई

सिनेअभिनेत्री संस्कृती बालगुडे आणि सिनेअभिनेत्री धनश्री काडगावकर यांनी विविध गीतांवर नृत्य सादर करुन रसिकांची मने जिंकली. सिनेअभिनेत्री संस्कृती बालगुडे आणि धनश्री काडगावकर यांच्या बहारदार नृत्यासोबत उपस्थित तरुणाईही थिरकली.

## राज्य उत्पादन शुल्क विभागाचे धाडसत्र
## एक कार व दोन दुचाकी वाहनासह सुमारे 19 लाखाचा मुद्देमाल जप्त

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्य उत्पादन शुल्क सोलापूर कडुन दि.21 ऑगस्ट 2024 ते दि.23 ऑगस्ट 2024 या कालावधित विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, पुणे विभाग, सागर धोमकर, अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, जि. सोलापूर भाग्यश्री जाधव, उपअधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर (मुख्यालय) .एस. आर. पाटील, यांचे मार्गदर्शनखाली, भाग्यश्री जाधव अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क जिल्हा सोलापूर यांचे प्रत्यक्ष नियंत्रणाखाली आज राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत अवैध हातभट्टी दारू निर्मिती व अवैध दारू वाहतूक याबाबत राबवण्यात आलेल्या मोहिमेमध्ये मुळेगाव तांडा व वडजी तांडा तालुका दक्षिण सोलापूर, पंढरपूर तालुका, माळशिरस तालुका जिल्हा सोलापूर या ठिकाणी टाकण्यात आलेल्या धाडी मध्ये हातभट्टी दारू निर्मिती बाबत एकूण 20 गुन्हे नोंद करण्यात आलेले आहेत.

या गुन्ह्यामध्ये 28,400 लिटर रसायन जप्त करून नाश करण्यात आले तर 1515 लिटर हातभट्टी दारू जप्त करून नाश करण्यात आलेली आहे. या ठिकाणी नोंदवण्यात आलेल्या गुन्ह्यांमध्ये 04 आरोपी फरार आहेत, तर 14 जणांच्या विरुद्ध गुन्हे नोंद करण्यात आलेले आहेत.




निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क अ व इ विभाग, भरारी पथक, पंढरपूर विभाग, माळशिरस विभाग यांनी अवैध हातभट्टी निर्मिती व अवैध दारू विक्री केंद्रांविरुद्ध राबवलेल्या मोहिमेमध्ये एकूण 20 गुन्हे नोंद करण्यात आलेले आहेत. यामध्ये 20400 लिटर रसायन, 1515 लिटर हातभट्टी दारु जप्त करून नाश करण्यात आलेली आहे. यासह देशी विदेशी व बियर जप्त करण्यात आलेली आहे. तसेच त्यांनी नोंद केलेल्या गुन्ह्यांमध्ये एका चार चाकी वाहनाचा व दोन दुचाकी चा देखील समावेश आहे. या धाडसत्रांमध्ये एकूण रु. 1875040/-इतक्या रक्कमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

ही कारवाई जगन्नाथ पाटील निरीक्षक, श्री. अविनाश घाडगे, श्री रामचंद्र चवरे, निरीक्षक श्री. पंकज कुंभार, निरीक्षक राउशु, पंढरपूर, सुखदेव सिद्ध, समाधान शेळके, धनाजी पोवार, दत्तात्रय लाडके, मानसी वाघ श्रध्दा गडदे, श्री. डी.बी.पाटील दुय्यम निरीक्षक, श्री. जीवन मुंडे, आलिम शेख, होळकर सहाय्यक दुय्यम निरीक्षक, जवान सर्वश्री. पांढरे, तोगी, गोडिकट, इंगवले, माळी, करचे, वेळापुरे, बेगमपुरे, खंदारे, रशिद शेख, दिपक वाघमारे, संजय नवले, विजयकुमार शेळके, प्रकाश सावंत, विकास वडमिले यांनी केली.

राज्य उत्पादन शुल्क विभाग जिल्हा सोलापूर यांचेकडून आवाहन करण्यात येते की, अवैध मद्य निर्मिती, विक्री, वाहतूक, साठवणूक तसेच गोवा राज्य निर्मित मद्य, बनावट मद्याची विक्री वाहतूक अथवा साठयाबाबत माहिती असल्यास त्याबाबतची तक्रार या विभागाचा टोल फ्री क्रमांक 1800 233 9999 व व्हाट्सअॅप क्रमांक 8422001133 यावर करण्यात यावी. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल.



## संपादकीय

# सरकारची माघार

केंद्र सरकारने नोकरशाहीत काही जागांवर थेट भरती करण्याचा निर्णय घेतला होता. विरोधी पक्षांच्या विरोधामुळे त्यांना 'लॅटरल एन्ट्री'चा हा निर्णय मागे घ्यावा लागला. याच मुद्द्यावरून काँग्रेस पक्षाने शाब्दिक हल्लाबोल सुरूच ठेवला आहे.
त्यांच्या सरकारविरुद्ध टीकेचा सार असा आहे की, स्वतःला तिसऱ्यांदा विजयी समजणाऱ्या भारतीय जनता पार्टीला आता खऱ्या अर्थाने जनादेशाचा अर्थ समजला असावा. हा जनादेश पूर्णपणे भाजपच्या बाजूने नाही. त्यामुळे भाजपच्या नेतृत्वाखालील सरकारला गेल्या दहा वर्षांतील सवय सोडावी लागणार आहे. त्यांना निर्णय लादता येणार नाही, तर अगोदर किमान त्यांच्या सहकारी पक्षांशीही त्याबाबत पूर्व चर्चा करावी लागेल. काँग्रेसच्या म्हणण्यानुसार, अवघ्या दोन महिन्यांत सरकारला चार वेळा माघार घ्यावी लागली आहे. म्हटले तर हे लोकशाहीच्या दृष्टीने चांगलेच आहे. त्याचे कारण सरकारने आपलेच म्हणणे पुढे रेटणे आणि अन्य पक्षांची पत्रास न ठेवणे हे अनियंत्रितपणाचे लक्षण असते. तसे सरकारला आता करता येत नसून या माघारीतून त्यांनी बोध घ्यायला हवा. वास्तविक प्रशासनात अनुभवी किंवा एखाद्या विषयातील तज्ज्ञांची सेवा घेणे नवीन नाही. पंडित नेहरूंपासूनच ती परंपरा सुरू आहे व त्यामुळेच देश आज इथपर्यंत मजल मारू शकला. नेहरू यांच्या नंतरच्या सरकारांनाही या परंपरेचे वावडे नव्हते. अनेक उच्च पदांवर अशा तज्ज्ञांना थेटपणे आणले गेले. डॉ. मनमोहन सिंग आणि मॉंटेकसिंग अहलुवालिया ही याची ठळक आणि सन्माननीय उदाहरणे. तसेच 45 जागांवर आता सरकारला करायचे होते. मात्र, त्यांना माघार घ्यावी लागली याचा अर्थ स्पष्ट आहे की सरकारवर दबाव होता. हा दबाव केवळ विरोधी पक्षांचाच नव्हता, तर मित्रपक्षांचाही होता. सरकारच्या स्थैर्यासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या तेलगु देसम पक्षाचे चंद्राबाबू नायडू यांचे खरेतर 'लॅटरल एन्ट्री'ला समर्थनच होते. सरकारने अनुभवी तज्ज्ञांची मदत घ्यायला हवी, असे त्यांचे मानणे आहे व नायडू यांचा एकूण पिंड पाहता ते हीच भूमिका घेतील हे अपेक्षितच होते. चिराग पासवान आणि संयुक्त जनता दलाने मात्र जाहीर विरोध केला. त्यातून एक स्पष्ट झाले आहे, की मोदी सरकारने हा निर्णय घेण्यापूर्वी मित्रपक्षांशीही चर्चा केली नव्हती. तसे त्यांनी केले असते तर नंतर माघारीचे पाऊल त्यांना उचलावे लागले नसते. रणनीतीच्या दृष्टिकोनातून ही सरकारची चूकच झाली व भविष्यात त्यांना यात सुधारणा करावी लागेल. सरकारने आणखी एका गोष्टीचे स्मरण ठेवणे आवश्यक आहे की गेल्या दहा वर्षांत त्यांना टोकणारे कोणीच नव्हते. कारण त्यांना कोणाच्या टेकूची गरजच नव्हती. त्यामुळे जो निर्णय होत होता तो कथित सहमतीनेच झाला, असे मानण्याचा पायंडा पडला होता. त्यात लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीपासून मोठा बदल झाला आहे.
देशाचे एकूणच राजकारण नकारात्मक वळणावर गेले आहे. लोकसभा निवडणुकीत संविधान बदलाची जी हाकाटी दिली गेली त्या ठिकाणीच आता सगळे मुद्दे नेऊन थांबवले जात आहेत. 'लॅटरल एन्ट्री'च्या बाबतीतही तसे जाणीवपूर्वक केले गेले आणि या बाबतीत आपण असे करणे आवश्यक होते का याचा विरोधकांनीही विचार करणे आवश्यक. तथापि, दोन महिन्यांत सरकारला चार वेळा माघार घ्यायला लावली या आनंदातच जर विरोधी पक्षांना राहायचे असेल तर त्यांना ते लखलाभ. भारताचा गाडा अशाने पुढे जाणार नाही. सरकारला थेट भरती करून एससी-एसटींचे आरक्षण हिरावून घ्यायचे असल्याचा विरोधी पक्षांचा प्रमुख आक्षेप होता. थेट भरती केली म्हणजे नियमितपणे भरती झालेल्या लोकांच्या योग्यतेवर अविश्वास दाखवण्यासारखे आहे, असे चित्रही जाणीवपूर्वक उभे करण्याची आवश्यकता नव्हती. मंत्रालयांचे कामकाज अर्थात एकूणच सरकार नोकरशाहीच्या भरवशावरच चालत असते. त्यात विभिन्न पार्श्वभूमीचे लोक असतात. काहींकडे तांत्रिक कौशल्यही असते, सगळ्यांकडे ते नसते. काही वेळा अधिकार्यांना कौशल्य सुधारणेसाठी परदेशातही पाठवले जाते. हे सगळे होत असताना अचानक मोठ्या प्रमाणावर बाहेरून थेट माणसे आणून बसवल्यामुळे गदारोळ माजणे स्वाभाविक होते. थेट भरतीला विरोधाचे दुसरे कारण असेही सांगितले गेले की हे लोक सरकारच्या मर्जीने आणले गेलेले असतात त्यामुळे ते सरकार धार्जिणीच भूमिका घेतात. त्यांच्या अगोदर त्या खात्यात आपल्या गुणवत्तेवर दाखल झालेल्यांच्या प्रगतीची दारे त्यांच्यामुळे संकुचित होतात. हा मुद्दाही रास्त आहे, मात्र जेव्हा आपल्याला बदलत्या जगाची गरज म्हणून काही गोष्टी वेगळ्या प्रकारे कराव्या लागणार असतील आणि त्याकरता ठराविक पठडीच्या बाहेर जाऊन विचार करणार्या तज्ज्ञांची आवश्यकता भासत असेल, तर त्यालाही आडकाठी असता कामा नये. अनेक सन्मानीय व्यक्तींनी असामान्य संकटातून देशाला बाहेर काढले आहे ते याच तज्ज्ञांच्या असामान्य बुद्धिमत्तेमुळे आणि त्यांनी घेतलेल्या निर्णयांमुळे. आपण काही किंवा सर्वच बाबींची राजकारणाशीच सांगड घालण्याचा नकारात्मक पवित्रा सातत्याने स्वीकारला, तर तो देशाच्या हिताचा असणार नाही. नियमित प्रशासकीय अधिकारी आणि त्यांच्या पात्रतेचा व योग्यतेचा आदर आहेच, पण आपणच सर्वज्ञ असल्याचे जेव्हा वाटू लागते तेव्हा प्रगतीला फार मर्यादित वाव राहतो. तो अंततः कोणाच्या हिताचा नसतो. सरकारच्या माघारीचा आनंद मानत असताना याचाही विचार जरूर व्हावा की भविष्यात आपण सत्तेवर आल्यावर जर आपल्यालाही भविष्याचा विचार करून काही वेगळे मार्ग चोखाळावे लागले, तर आपली आजची भूमिका त्यावेळी आपल्याला अवघडलेपण आणणार तर नाही ना?

पान १ वरून

## बदलापूर प्रकरणाच्या तपासासाठी...

झेंडा घेऊन आणि तोंडाला काळी पट्टी बांधून बसणार आहोत. पण जर जनतेने उद्या स्वतःहून बंद केला तर आमचा त्याच्याशी काहीही संबंध राहणार नाही, असेही नाना पटोले म्हणाले.

उद्धव ठाकरे यांनीही बंद मागे घेण्याचा निर्णय घेतला, मात्र शनिवारी ते स्वतः रस्त्यावर उतरणार आहेत. बंद नसला तरी प्रत्येक गावात प्रत्येक शहरात काळ्या फिती लावून निषेध करणार आहोत, आंदोलन करणार आहोत, असे उद्धव ठाकरे यांनी शुक्रवारी जाहीर केले.

महाविकास आघाडीचे नेते काळ्या फिती लावून निषेध करणार आहे. मी शिवसेना भवनासमोरील चौकात उद्या सकाळी ११ वाजता तोंडाला काळ्या फिती लावून बसणार आहे. त्याला कोणी मनाई करु शकत नाही. त्याला मनाई केली तर जनतेचे न्यायालय आहे. भावना व्यक्त करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

सर्वांना आपल्या कुटुंबाची काळजी आहे. बहीण, आईची काळजी आहे. तिचे रक्षण करणारे कोण आहे, हे सर्वांच्या मनात आहे. यामुळे बंद करायचा प्रयत्न केला. बंद कायद्यानुसार करता येत नसल्याने मी तोंडाला काळीफीत लावणार आहे. माझे रक्षण करण्यासाठी कोणी येत नाही असे लोकांना वाटते, तेव्हा लोक रस्त्यावर उतरतात. बांगलादेशात ते सर्वांनी पाहिले आहे. ते आपल्या देशात होऊ नये म्हणून आमचे प्रयत्न आहेत. सरकार नराधमांना पाठीशी घालवत आहे. उत्स्फूर्तपणे आंदोलन करणाऱ्यांना गुन्हेगार ठरवले जात आहे. ते स्वतःच्या विश्वात मश्गुल आहेत. त्यामुळेच आम्ही आंदोलन करत राहणार आहोत. लोकांना जागरूक करत आहोत, असेही ते म्हणाले.

# विद्यार्थी-विद्यार्थीनीच्या सुरक्षेसाठी राबवावयाच्या उपाययोजना

शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांची सुरक्षा अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. यासाठीच्या उपाययोजनांसंदर्भात शासन स्तरावरून वेळोवेळी निर्णय घेतले जातात. शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने अलीकडील काळात घडलेल्या काही अनुचित घटनांची शासनाने गंभीर दखल घेतली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या उपाययोजनांच्या प्रभावी अंमलबजावणी तसेच काही नवीन उपाययोजना लागू करण्याचा शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने निर्णय घेतला आहे.

राज्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थी-विद्यार्थीनींना सर्वतोपरी सुरक्षा मिळणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने राज्यातील सर्व शाळा व परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या नियुक्तीच्या अनुषंगाने घ्यावयाची काळजी, शाळांमध्ये तक्रार पेटी बसविणे, सखी सावित्री समितीबाबतच्या तरतुदींचे पालन करणे, विद्यार्थी सुरक्षा समितीचे गठन तसेच राज्यस्तरीय विद्यार्थी सुरक्षा आढावा समिती स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

### शाळा व परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे

शाळा व परिसरात विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरा हा उत्तम पर्याय असून खाजगी व्यवस्थापनाच्या सर्व शाळांकरिता येत्या एक महिन्यात मोक्याच्या ठिकाणी पर्याप्त संख्येने सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बंधनकारक असणार आहे. तर शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ज्या शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले नाहीत अशा शाळांनी प्राधान्याने कॅमेरे बसविण्याबाबत कार्यवाही करावयाची आहे. जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत पायाभूत सुविधांचे निर्माण या घटकांतर्गत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी पाच टक्के प्रमाणात राखीव ठेवण्यात आलेल्या निधीचा त्यासाठी वापर करता येणार असून शाळा परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज ठराविक अंतराने तपासणे बंधनकारक केले आहे. अशा फुटेजमध्ये आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास त्यावर तातडीने योग्य कार्यवाही करण्याची जबाबदारी विशेषत्वाने मुख्याध्यापकांची आणि सर्वसाधारणपणे शाळा व्यवस्थापन समितीची असेल.

### शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीच्या अनुषंगाने घ्यावयाची काळजी

नियमित कर्मचाऱ्यांबरोबरच बाह्य स्त्रोतांद्वारे अथवा कंत्राटी पद्धतीने केल्या जाणाऱ्या नेमणुकांबाबत शाळा व्यवस्थापनामार्फत काटेकोर तपासणी होणे आवश्यक आहे. यासाठी नेमणुकीपूर्वी चारित्र्य पडताळणी अहवाल स्थानिक पोलीस यंत्रणेमार्फत प्राप्त करून घेणे आवश्यक राहणार आहे. त्याचप्रमाणे नेमणुकीनंतर संबंधित व्यक्तीच्या छायाचित्रासह त्याची सर्व तपशीलवार माहिती स्थानिक पोलीस यंत्रणांकडे देणे आवश्यक राहील. शिक्षकेतर कर्मचारी नियुक्त करताना सहा वर्षापर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी प्राधान्याने महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणेही बंधनकारक असणार आहे.

### तक्रार पेटी

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत करावयाच्या ठोस उपाययोजनांचा भाग म्हणून शाळांमध्ये तक्रार पेटी बसविण्याबाबत 5 मे 2017 रोजी आदेश देण्यात आले आहेत. या संदर्भात शाळा व्यवस्थापनावर जबाबदारी निश्चित करण्यात आली असून तक्रारपेटी उघडण्याबाबत तसेच त्यात प्राप्त झालेल्या तक्रारीवर करावयाच्या कार्यवाही सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांकरिता तक्रार पेटी बसविणे अनिवार्य असून त्यासंदर्भातील तरतुदींचे पालन करणे बंधनकारक आहे. या तक्रार पेटीचा वापर प्रभावीपणे होतो किंवा कसे याची तपासणी होणे आवश्यक असून ही जबाबदारी शाळेच्या मुख्याध्यापकाची असेल.

### विविध समित्यांचे गठन

शाळा, केंद्र, तालुका अथवा शहर साधन केंद्र या स्तरावर सखी सावित्री समितीचे गठन करण्यात आले आहे. समित्यांनी त्यांना नेमून दिलेले कार्य विहित कालावधीत पार पाडणे आणि त्यांचा नियमित आढावा घेणे आवश्यक आहे.

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने अनुचित प्रकारांचे समूळ उच्चाटन होणे आवश्यक आहे. यासाठी ज्या प्रकारे कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळाबाबतच्या तक्रारींच्या अनुषंगाने उपाययोजना करण्यात आल्या आहेत, त्याचप्रकारे शालेय विद्यार्थ्यांच्या प्रकरणी देखील अशा उपाययोजना होणे गरजेचे आहे. त्यासाठी शाळास्तरावर शिक्षणाधिकारी यांच्या स्तरावरून 'विद्यार्थी सुरक्षा समिती'चे गठन एक आठवड्यात करण्यात यावे, जेणेकरून ही समिती वेळोवेळी विद्यार्थ्यांशी चर्चा करून त्यांच्या समस्या समजावून घेऊ शकेल.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसंदर्भात करण्यात आलेल्या उपाययोजनांचा राज्यस्तरावर आढावा घेण्यासाठी शालेय शिक्षण आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. या समितीमध्ये महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक, शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), तसेच शालेय शिक्षण आयुक्त यांनी नामनिर्देशित केलेल्या शालेय शिक्षण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या गट-अ मधील दोन महिला अधिकारी हे सदस्य असतील. तर शालेय शिक्षण आयुक्त कार्यालयातील सहसंचालक (प्रशासन) हे या समितीचे सदस्य सचिव असतील.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या संदभार्तील उपाययोजनांचा गटशिक्षणाधिकारी व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक) यांच्याकडून अनुक्रमे महिन्यातून एकदा व दोन महिन्यातून एकदा आढावा घेण्यात येणार आहे. यासाठी आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यांचे व पालकांचे जबाब नोंदवले जातील. याबाबतचा अहवाल राज्यस्तरीय विद्यार्थी सुरक्षा आढावा समिती सादर करेल. राज्यस्तरीय विद्यार्थी सुरक्षा आढावा समिती तीन महिन्यातून एकदा शैक्षणिक विभागनिहाय करण्यात आलेल्या उपाययोजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेऊन त्याबाबतचा अहवाल शासनास वेळोवेळी सादर करणार आहे.

शाळेमध्ये विद्यार्थ्यांसोबत अनुचित प्रकार घडल्याचे उघड झाल्यानंतर संबंधित शाळा व्यवस्थापन, संस्था, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी ही बाब 24 तासाच्या आज संबंधित शिक्षणाधिकारी यांना कळवावी. अशी अनुचित घटना कोणत्याही प्रकारे दडवून ठेवण्याचा प्रयत्न झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित व्यक्ती अथवा संस्था गंभीर कार्यवाहीस पात्र ठरतील. या उपाययोजना विद्यार्थ्यांच्या विशेषतः मुलींच्या सुरक्षेच्यादृष्टीने हिताच्या ठरतील.

**संकलन :** विभागीय माहिती कार्यालय, पुणे

## प्रबोधन

# संस्कृतीच्या नावे। सैतानांचे चाळे

संस्कृती या शब्दाचा रात्रंदिवस जप करणाऱ्या संस्कृतीनिष्ठ बहाद्दरांना संस्कृती म्हणजे काय, असा प्रश्न विचारला, तर ते पटकन उत्तर देऊ शकणार नाहीत. कारण संस्कृतीच्या व्याख्या अनेक विचारवंतांनी केल्या आहेत आणि त्या खूप वेगवेगळ्या आहेत. एक विचारवंत म्हणतो, 'संस्कृती म्हणजे विचारप्रणाली!' डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'कृतज्ञता म्हणजे संस्कृती.' त्यांनी केलेली आणखी एक व्याख्या म्हणते, 'जीवनाला जे उजाळा देतं, समृद्ध करतं, पुढे नेतं ती सर्व संस्कृतीच असते.' प्राचार्य शिवाजीराव भोसले म्हणतात, 'जी वाट्याला येते ती प्रकृती, जी घडवली जाते ती संस्कृती!' पंडित नेहरू म्हणतात, 'संस्कृती' म्हणजे आपल्या मनावर ताबा आणि दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव.' पाश्चात्त्य तत्त्वज्ञ मॅथ्यू आर्नाल्ड म्हणतात, 'जगातील थोरांचा उपदेश आणि त्यांच्या विचारांचं ज्ञान म्हणजेच संस्कृती.' एकूण सर्व सद्गुण, सर्व चांगल्या गोष्टी ही संस्कृतीच असते. दया, प्रेम, निःस्वार्थीपणा, क्षमाशीलता, सहनशीलता, चिंतन-मनन-प्रेम, सत्य- शिव-सुंदरविषयक आस्था, कृतज्ञता, परोपकारिता, कलाप्रेम, ज्ञानपिपासा, विज्ञाननिष्ठा, शुचिता, साधेपणा, उच्चविचार, निष्कपटपणा, वात्सल्य, मार्दव ही गुणसंपत्ती संस्कृतीच असते.
भारतीय संस्कृतीविषयी आजपर्यंत तरी चांगलं बोललं गेलं. कुणी म्हणाले, 'भारताने जी संस्कृती निर्माण केली तिला जगात तोड नाही!' तर मानवतावादी साने गुरुजी म्हणाले, 'भारतीय संस्कृतीवर प्रेम करण्यात मी कुणाला हार जाणार नाही.' पण काळ बदलला, शिक्षण मुक्त झालं आणि समाजाच्या त्रस्त, पीडित, दलित, बहिष्कृत वर्गातून आलेल्या विचारवंतांनी भारतीय संस्कृतीचं खरं, दुटप्पी, ढोंगी, विकृत स्वरूप स्पष्ट करण्यास प्रारंभ केला. श्रुती-स्मृती-शास्त्रं म्हणजे भारतीय संस्कृती, असं म्हणणाऱ्यांना आद्य समाजप्रबोधनकार लोकहितवादी देशमुख बजावतात, 'शास्त्रार्थ लोकहिताविरुद्ध असेल, तर तो बाजूला ठेवा. साक्षात ब्रह्मदेव विरुद्ध असला, तरी डगमगू नका.' स्त्रियांना-शूद्रांना शिक्षणाची बंदी करणारी संस्कृती मोडण्यासाठी जोतिराव फुलेंनी स्त्रीशिक्षणाची, शूद्रांच्या शिक्षणाची मोहीम हाती घेतली. तर उच्चवर्णीयांच्या स्वार्थाचं रक्षण करणारी मनुस्मृती डॉ. आंबेडकरांनी सार्वजनिक स्थानी जाळून भेदनीतीवर आधारलेल्या भारतीय संस्कृतीलाच आग लावली. ज्या धर्माने पक्षपाती संस्कृतीला जन्म दिला आणि आपल्याच धर्म-देशबांधवांना अमानुष यातना भोगायला लावल्या त्या धर्माचाही त्याग त्यांनी विचारपूर्वक केला. मनुस्मृती हे ज्या संस्कृतीचं मुख आहे, तिने शूद्रांच्या द्वेषाचं विष किती ओकावं याला काही सुमारच नव्हता. मनुस्मृती म्हणते, 'यज्ञाची अंगे अपूर्ण राहिल्यास व ती वैश्यापासून न मिळाल्यास शूद्राच्या गृहातून बलात्काराने किंवा चोरी करून निःशंकपणे आणावी.' तसंच दुसऱ्या एका ठिकाणी 'शूद्र हा ब्राह्मणाच्या दास्याकरिता निर्माण केला आहे. दासाच्या स्वामीने जरी आपल्या दास्यातून मुक्त केलं, तरी ब्राह्मणाच्या दास्यातून तो मुक्त होत नाही.' आपलीच पिल्लं सर्पिण खाते, असं म्हणतात. भारतीय संस्कृती ही अशीच एक दुष्ट सर्पिण होती, हे सूर्यप्रकाशाइतकं स्पष्ट आहे. जगात ह्या संस्कृतीला तोड नाही, हे वरील वचन ह्या अर्थाने खरंच आहे.
साने गुरुजी भावविवश झाल्यावर, 'मी भारतीय संस्कृतीचा भक्त आहे,' असं म्हणाले होते. पण विचाराधीन झाल्यावर मात्र भारतीय संस्कृतीचे टीकाकार होऊन म्हणतात, 'आज भारतीय संस्कृतीच्या नावाखाली गप्पा मारणारे लोक विषमता मख्खपणे पाहात आहेत. त्यांना त्याचं दुःख नाही. श्रमहीन श्रीमंत कितीजणांना रडवत आहेत, इकडे त्यांचं लक्ष नाही. भारतीय संस्कृतीचा हे लोक वध करीत आहेत. भारतीय संस्कृतीचा आत्मा साम्यवादीच ओळखू शकेल.' साने गुरुजींनी केलेली लोकसमीक्षा ही संस्कृती समीक्षाच आहे! म्हणूनच-

संस्कृतीच्या नावे। सैतानांचे चाळे
आवळती गळे। स्वकियांचे ॥ १
संस्कृती ही नव्हे । नीच ही सर्पिण
पिल्लांना खाऊन । करी फस्त ॥ २
शिका नि शहाणे व्हा। जोतिबा सांगतात
मर्म घ्या ध्यानात। सुजाणांनो ॥ ३
धर्म, रुढी यांचे जोखड फेकावे
लोक मुक्त व्हावे । त्यांना वाटे ॥४
देवाधर्मामध्ये। लोका गुंतवून
संस्कृतीरक्षक करी चैन अद्यापही ॥५
प्रसारमाध्यमे । ठेवूनिया हाती
सनातनी नाचताती। दुर्दैव हे ॥६



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना:
# अडचण आल्यास 02186-223556 हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा लाभ तालुक्यातील सर्व पात्र महिलांना मिळावा यासाठी त्यांच्या अडचणी सोडविण्याकरीता पंढरपूर तहसिल कार्यालय येथे ०२१८६-२२३५५६ हा हेल्पलाईन क्रमांक सुरु करण्यात आला आहे. या योजनेतर्गत ज्या लाभार्थ्यांना कुठल्याही अडचणी किंवा समस्या आल्यास हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन तहसिलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही शासनाची महत्वाकांक्षी योजना असून, त्याव्दारे पात्र लाभार्थी महिलांना दर महिन्याला दीड हजार रुपये देण्यात येतात. तालुक्यातील एकही पात्र महिला या योजनेपासून वंचित राहणार नाही याकरीता तालुका प्रशासन स्थानिक लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने अहोरात्र काम करीत आहेत. महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, स्वांवलंबीकरण, आत्मनिर्भर करण्याबरोच महिलांच्या सशक्तीकरणाला चालना देण्याकरीता 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' योजना सुरू करण्यात आली आहे. योजनेअंतर्गत समाजातील सर्व घटकातील पात्र महिलांना प्रतिमाह १ हजार ५०० रुपयांचा लाभ देण्यात येणार असून त्याकरीता महिलांनी तात्काळ अर्ज करावे, असे आवाहन तहसिलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेकरीता पंढरपूर तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून, या योजनेकरिता तालुक्यातून सुमारे 95 हजार महिलांनी अर्ज दाखल केले आहेत. त्यापैकी 70 हजार लाभार्थ्यांना मान्यता देण्यात आली आहे उर्वरित 25 हजार लाभार्थ्यांची छाननी येत्या दोन दिवसांत पुर्ण करण्यात येणार आहे. यापुर्वी पात्र ठरलेल्या महिलांना १४ ऑगस्टपासून प्रत्यक्ष लाभ मिळण्यास सुरुवात झाल्यामुळे महिलावर्गात समाधानाची भावना व्यक्त होत आहे, प्रशासनाच्यावतीने प्राप्त प्रत्येक अजार्ची छाननी करण्यात आली. छाननीअंती पात्र ठरलेल्या महिलांच्या बँक खात्यात १४ ऑगस्टपासून जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे मिळून प्रत्येकी ३ हजार रुपये जमा करण्यास सुरुवात झाली आहे असे महिला बाल विकास प्रकल्प अधिकारी समाधान नागणे यांनी सांगितले.

तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेकरीता अर्ज केलेल्या पंढरपूर तालुक्यातील 2 हजार 355 पात्र महिलांना प्रत्यक्ष लाभ घेण्यासाठी तत्काळ ईकेवायसी संबधित बॅकेत करुन घ्यावे असे आवाहनही बाल विकास प्रकल्प अधिकारी श्री नागणे यांनी केले आहे.

# स्वाभिमानी शेतकरी संघटना जाहिर पाठींबा देणार : जिल्हाध्यक्ष शिवाजी पाटील

**कोर्टी (कटूसत्य वृत्त):-** होऊ घातलेल्या करमाळा विधानसभा निवडणुकीसाठी दत्ताचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामदास झोळ हे इच्छुक असल्याने त्यांच्या उमेदवारीला स्वाभिमानी शेतकरी संघटना जाहिर पाठींबा देत असल्याचे संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवाजी पाटील यांनी म्हटले आहे. करमाळा-माढा मतदारसंघात सर्वसामान्य जनता, शेतकरी विकासासाठी प्रा. झोळ यांनी यशस्वीपणे भूमिका बजावल्यामुळे तालुक्याचा सर्वांगीण विकास करण्यासाठी,शेतकरी हितासाठी प्रा. झोळ यांना येणाऱ्या विधानसभेला पाठींबा देणार असल्याचे मत, पाटील यांनी व्यक्त केले आहे. यामुळे विद्यमान आमदार संजयमामा शिंदे यांना जोरदार धक्का बसला आहे. याबाबत पुढे



बोलताना पाटील यांनी सांगितले की, विद्यमान आमदार असून सर्व परिस्थिती चांगली असताना देखील शिंदे बंधुंनी २०२३-२४ हंगामातील ऊस बिले अद्यापही दिली नाहीत. ऊस वाहतुकदारांची बिले दिली नाहीत. शेतकऱ्यांच्या नावावर कर्ज उचलले आहे. काही शेतकऱ्यांची कर्ज एकरकमी भरल्यामुळे त्यांची सिबील खराब झाली आहेत. त्यामुळे शेतकरी देशोधडीला लागला आहे. मराठा आरक्षणाबात त्यांनी कोणतीही ठोस भूमीका घेतलेली नाही. परंतु स्वतःकुणबी दाखले काढून विविध योजनांचा लाभ घेतला आहे. या सर्व गोष्टीमुळे आम्ही आ. संजयमामा शिंदे यांना २०२४ ला पाठींबा देणार नाही.यावेळी हनुमंत सातव,पोपट जगताप, जिल्हा उपाध्यक्ष रवींद्र गोडगे, रहिमान मुलाणी, सुनील कांबळे, फिरोज फकीर, रामचंद्र सावळकर, वैभव सुर्वे, गोपीनाथ पाटील उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय, कार्यकर्ता व सेवक पुरस्कारासाठी २५ सप्टेंबर पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत ग्रंथालय संचालनालयाकडून राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचा गुणात्मक विकास व्हावा या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार तसेच, ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते व सेवक यांना भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. शियाली रामामृत रंगनाथन यांच्या नावाने डॉ. एस आर रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक पुरस्कार देण्यात येतो. यासाठी 25 सप्टेंबर पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सन २०२३-२४ या वर्षीच्या पुरस्कारासाठी इच्छुक असणारी ग्रंथालये, कार्यकर्ते व सेवक यांनी आपले विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह २६ ऑगस्ट २०२४ ते २५ सप्टेंबर २०२४ पर्यंत तीन प्रतीत आपल्या जिल्ह्यातील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांकडे पाठवावे. राज्यातील शहरी व ग्रामीण विभागातील अ, ब, क, ड वगार्तील उत्कृष्ट शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना अनुक्रमे रुपये १ लाख रुपये, ७५ हजार रुपये, ५० हजार रुपये, २५ हजार रुपये, सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र, ग्रंथ भेट आणि रोख रक्कम देऊन गौरवण्यात येते.

# मौजे खवणी ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी प्रा. सतीश माणिक खिलारे यांची बिनविरोध निवड

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** खवणी ता. मोहोळ, जि. सोलापूर येथील ग्रामपंचायतीच्या रिक्त झालेल्या उपसरपंच पदावर प्रा. सतीश माणिक खिलारे स यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची उपसरपंच पदी बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी घोषित केले. खवणी ग्रामपंचायतीवर शिवछत्रपती ग्रामविकास आघाडीची सत्ता असून खवणी ग्रामपंचायतीचे सरपंच पद हे ना.




मा. प्र. महिला प्रवगार्साठी राखीव असल्याने शितलताई यमगर या विद्यमान सरपंच आहेत. उपसरपंच पदावर काम करण्यासाठी महिलांना संधी मिळावी म्हणून यापूर्वी सौ. सिंधुताई बोबडे, रेखाताई भोसले, सुरेखाताई भोसले यांना प्रतेकी एक वषार्साठी उपसरपंच पदाची संधी दिली होती. तर येणाऱ्या दोन वषार्साठी उपसरपंच म्हणून काम करण्याची संधी प्रा. सतीश खिलारे यांना देण्यात आली आहे. सतीश खिलारे हे अनुसूचित जाती प्रवगार्तून प्रतिनिधित्व करत असून त्यांचे शिक्षण एम. ए., बी. एड. झाले आहे. खवणी गावच्या चौफेर विकासामध्ये त्यांचा सिंहाच्या वाटा आहे.

यावेळी भाजपा अ. जा. मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष संजीव खिलारे, शिवछत्रपती ग्रामविकास आघाडीचे नेते प्रा. अजितसिंह भोसले, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी जिल्हा उद्योग आघाडीचे कार्याध्यक्ष तेजस बोबडे, सरपंच शितलताई यमगर, माजी उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्या अनुक्रमे सिंधुताई बोबडे - रेखाताई भोसले - सुरेखाताई भोसले, ग्रामसेवक सोमनाथ सोनवणे, महादेव यमगर, किसन भोसले, तेजस खिलारे इ. ग्रामस्थ उपस्थित होते.

## वात्रटिका

### चेहरा आधी ठरवा

मलाच मिळेल पसंती
असा त्यांचा विश्वास आहे...
म्हणून चेहरा ठरला पाहिजे
असा त्यांचा अट्टाहास आहे...
राजकारणात आता कोणी
उरलेला नायक नाही...
पदासाठी आम्हाला वाटते
तसा कोणी लायक नाही...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# आठ महिन्यात रोपळे ग्रामपंचायत ला 16 कोटी निधी

## आ.संजयमामा शिंदे यांचा भव्य दिव्य सन्मान

**कुर्डूवाडी (कटूसत्य वृत्त):-** माढा तालुक्यातील परंतू करमाळा विधानसभेला जोडलेल्या 36 गावांपैकी रोपळे ग्रामपंचायत ही गेली अनेक वर्ष आ.शिंदे यांच्या विरूध्द गेलेली. पण गेल्या आठ महिण्याखाली झालेल्या निवडणुकीत दादा मामा विचारांच्या नेतेमंडळींनी एकत्र येत आ.शिंदे यांच्या गटाची सत्ता रोपळे ग्रामपंचायतवर स्थापन केली. निवडणुकीत मिळालेल्या यशामुळे आ.शिंदे यांनी रोपळे ग्रामपंचायत ला सोळा कोटी रुपए निधी दिला तसेच दहीगाव उपसा सिंचन योजनेत रोपळेचा समावेश करित शिवारात पाणी आणण्याचा मार्ग मोकळा केला. त्यानिमित्त गावाच्या वतीने आ.शिंदे यांचा भव्य दिव्य सन्मान करण्यात आला.

मा.आमदार संजय मामा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त व शेतकऱ्यांचा शेतीच्या पाणी प्रश्न मार्गी लावण्यासाठी रोपळे गाव दहीगाव उपसा सिंचन योजनेत समाविष्ट केल्यामुळे रोपळे ग्रामपंचायत, रोपळे सोसायटी, तंटामुक्त समिती रोपळे,आमदार दादा मामा विचार मंच यांनी विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सलग चार दिवस कार्यक्रम घेतले. शुक्रवार दि.16.8.2024 ट्रॅक्टर फ्री सर्विसिंग कॅम्प,



### विधानसभेला सर्वात जास्त लीड रोपळे गाव देणार

आ.संजयमामा शिंदे यांनी रोपळेच्या इतिहासात सर्वाधिक जास्त निधी आणला आहे. गाव दुष्काळमुक्त होणार आहे. आगामी विधानसभेला करमाळा मतदार संघात रोपळे गाव आ.संजयमामा शिंदे यांना सर्वात जास्त मतदान करुन रेकॉर्ड ब्रेक लीड देणार असल्याचा विश्वास रोपळेकरांनी आ.शिंदे यांच्या सन्मान करताना सागितले.

शनिवार दिनांक.17.8.2024. रोजी भव्यदिव्य रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. त्यात 101 रक्त दात्याने रक्तात करून प्रतिसाद दिला ,रविवार दिनांक 18.8.2024 रोजी रोपळे येथुन अक्कलकोट येथे स्वामी समर्थ महाराज यात्रेसाठी गावातील महिला पुरूष मिळुन 355.भक्तानी महाराजांचे दर्शन घडवून आणले त्यामुळे भाविकाकडुन आनंद व्यक्त करूण मामासाहेब यांना शुभेच्छां दिल्या. 19.8.2024 सोमवार रोजी सकाळी 9.00 वा टुव्हीलर, फोरविलर गाडयाचे लायसन्स कॅम्प घेऊन तरूणांना गावातच लायसन्स काढण्यासाठी तरूणांना संधी उपलब्ध करून दिल्याने तरूण वर्ग आनंदी होते. आमदार मामासाहेब यानी गावातील अनेक विकास कामाचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळयात वरूण राजाने हाजरी लावली त्या पावसातच फटाक्याची आतिषबाजी व हालगीच्या कडकडाट नादात विविध विकास कामाचे फीत कापुन आमदार साहेब यांनी उद्घाघाटन केले या वेळी वाढदिवसानिमित्त यु पी एस सी, एम पी एस सी परीक्षेत यश संपादन केलेले विद्यार्थ्यांचा व वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान करण्यात आला तसेच महिला भगिनींना साडी वाटप आमदार मामासाहेब यांचे हस्ते करण्यात आले यावेळी मामासाहेब यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले कि रोपळे गावासाठी कसल्याही परिस्थीतीत पाणी आणणार असलेचे आपले भाषणात सांगितल्यानंतर टाळ्यांच्या गजरात ग्रामस्थांनी स्वागत केले. रोपळे गावच्या विकासासाठी कटिबद्ध असुन यापुढेही उर्वरीत कामासाठी निधी कमी पडू देणार नाही असे आ.शिंदे यांनी सागितले.

यावेळी रोपळे ग्राम पं चे सरपंच, उपसरपंच सर्व ग्रा. सदस्य तंटामुक्त अध्यक्ष उपाध्यक्ष, सोसायटी चेअरमन व्हा.चेअरमन सर्व सदस्य, आमदार दादा मामा विचार मंचाचे सर्व पदाधिकारी व शेतकरी, महिला भगिनी तरूण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.सर्व स्तरातून मामासाहेब यांचे कौतुक होत आहे.

# बहिणींच्या आनंद हाच आशीर्वाद मानतो - अभिजीत पाटील

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** 'खेळ पैठणीचा' कार्यक्रम मोठ्या आनंदात आणि माता भगिनींच्या उत्स्फूर्त प्रतिसादात संपन्न झाला. यातून त्यांना मिळणारा आनंद हाच मी आशीर्वाद मानतो, असे प्रतिपादन श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावरचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी केले.

सध्या विधानसभेच्या तोंडावर मतदारसंघांमध्ये भेटीगाठी व कार्यक्रम घेण्याच्या दृष्टीने अभिजीत पाटील आपला जनसंपर्क वाढवत असून विविध कार्यक्रम घेत असताना माढा तालुक्यात अभिजीत पाटील यांनी आपला चांगला चंग बांधलेला दिसून आला आहे. गेल्या काही दिवसांमध्ये माढा केसरी म्हणून कुस्ती स्पर्धा टेंभुर्णी येथे घेण्यात आल्या होत्या.

अभिजीत पाटील यांनी माढा तालुक्यातील माळशिरस तालुक्यात जोडलेल्या 14 गावांमध्ये देखील आपला जनसंपर्क वाढवत असल्याचे दिसून आले.



नागपंचमी व रक्षाबंधनानिमित्त विठ्ठल प्रतिष्ठान आयोजित अभिजीत आबा पाटील मित्रपरिवार महाळुंग यांच्या संकल्पनेतून वतीने 'खेळ पैठणीचा' कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी श्री विठ्ठल कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील बोलताना म्हणाले...संसाराची जबाबदारी पेलून अविरत कर्तव्य पार पाडणाऱ्या माता भगिनींना विरंगुळ्याचे आणि एकत्रित आनंदाचे काही तास मिळावे यासाठी या अभिनव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. यास मिळणाऱ्या उस्फुर्त प्रतिसाद आणि सर्व वयोगटातील सहभाग यामुळे प्रत्येक गावात हा कार्यक्रम यशस्वी होत आहे.

'खेळ पैठणीचा' या कार्यक्रमाला महाळुंग येथे उस्फुर्त प्रतिसाद.. शेकडो महिलांनी विविध खेळांमध्ये सहभाग घेतला आणि उत्कृष्ट संयोजनातून विलक्षण आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

या सर्व खेळामध्ये प्रथम क्रमांकाच्या विजेत्या सौ.जागृती सुरज कुंटे, द्वितीय क्रमांकाच्या सौ.सोनाली औदुंबर जाधव, तृतीय क्रमांकाच्या रूपाली प्रभाकर भगत व चतुर्थ सौ. वैष्णवी प्रशांत काळे या मानकरी ठरल्या.या कार्यक्रमाचे निवेदिका मोनिका जाजू यांनी केले.यावेळी नगराध्यक्षा लक्ष्मीताई चव्हाण, श्रीमतीदेवी मदन पाटील, मा. सरपंच अर्पणदेवी काकी पाटील, नगरसेवक प्रकाश नवगिरे, शिवसेना तालुका उपप्रमुख नितीन वाघमारे, सिद्धेश्वर पवार, भाग्यश्री भोसले, सुवर्णा गाडेकर, नेहा तळेकर, सोनाली जगताप, जयश्री दासू जमदाडे, जयश्री बनसोडे, निता शिंदे, रूपाली जमदाडे, संगीता बागल, मंदाकिनी पाटील, भारती बनसोडे, सुनीता मोटे, शितल लवटे, सुरेखा थिटे, वषार्ला वाघमारे, सविता बचुटे यासह अजिंक्य पाटील, सुनिल भोसले मित्र परिवारांने यशस्वी कार्यक्रमाचे नियोजन केले होते.

# माढा विधानसभा मतदार संघाची मतमोजणीची सर्व प्रक्रिया माढ्यातच करण्यात यावी

## माढा शहरवासियांची प्रशासनाकडे मागणी, प्रसंगी रस्त्यावर उतरणार

**माढा (कटूसत्य वृत्त):-** माढा विधानसभा मतदार संघाची मतमोजणीची सर्व प्रक्रिया कुडूर्वाडीत न करता माढ्यातच करण्यात यावी अशी मागणी माढा शहरवासियांच्या वतीने प्रशासनाकडे करण्यात आली.

माढा शहरातील सर्व पक्षीय नागरीकांच्या शिष्टमंडळाने तहसीलदार विनोद रणवरे यांची भेट घेऊन माढ्यातच निवडणुकीची प्रकिया राबण्याची आग्रही मागणी केली.

मागील निवडणुकीची मतणोजणी कुडूर्वाडी शहरापासून ५ कि.मी लांब असलेल्या वखार महामंडळाच्या हॉल मध्ये पार पडली होती.

माढ्यावरचा हा अन्याय कसाच खपवुन घेणार नाही.



मागील पंच वार्षिक निवडणुकीपासुन माढ्याची मतमोजणी कुडूर्वाडी येथे होत आहे.गत वर्षी देखील या प्रक्रियेला आम्ही विरोध दर्शवला होता. मात्र यंदा कोणत्याही परिस्थितीत माढ्यातच होण्यासाठी प्रसंगी वेळोवेळी आता तिव्र आंदोलने केली जातील. अशी प्रतिक्रिया शिवसेनेचे देविदास खरात व संभाजी ब्रिगेडचे दिनेश जगदाळे यांनी दिली

आंदोलने करुन आम्ही जेल मध्ये बसु तुम्ही दुसरी कोणतीही पयार्यी व्यवस्था उभी करा काहीही झाले तरी माढा विधानसभा मतदार संघाची मतमोजणी कुडूर्वाडी ऐवजी माढ्यातच व्हावी अशी ठोस भुमिका माढा शहरवासियांनी मांडली.प्रशासनाला दिलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे की, माढा विधानसभा निवडणुकीचे सर्व कामकाज गत वर्षी च्या निवडणुकी पासुन कुडूर्वाडी येथे होत आहे. कुडूर्वाडी हे गाव करमाळा विधानसभा मतदार संघात असुन माढा विधानसभेची मतमोजणी कुडूर्वाडी येथे का ? कोणत्याही परिस्थितीत माढ्यातच करण्यात यावी.

यावेळी शिवसेनेचे शहराध्यक्ष देविदास खरात, संभाजी ब्रिगेडचे दिनेश जगदाळे, मधुकर देशमुख, कॉग्रेसचे संजय पाटील, वंचित बहुजन आघाडीचे रवि सरवदे,भाजपाचे योगेश पाटील,आम आदमीचे विशाल देवकर, विशाल शेंडे,जितु जमदाडे, गोरख वाकडे,कांचन कांबळे आदीसह शहरवासिय उपस्थित होते.

# शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बुधवारी तीव्र निदर्शने करण्यात

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- बदलापूरमधील एका शाळेत दोन बालिकांवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ व राज्य सरकारविरोधात शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बुधवारी तीव्र निदर्शने करण्यात आली. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी राजीनामा द्यावा, राज्यपालांनी त्वरित सरकार बरखास्त करावे, अशी मागणी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे

पक्षाचे जिल्हाध्यक्ष अजय दासरी यांनी आंदोलनावेळी केली. बदलापूर येथील 'त्या' शिक्षण संस्थेवर आणि त्या नराधमावर कारवाई करण्यात दिरंगाई केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी आणि पीडित बालिकांना न्याय मिळावा,अशी मागणी उपजिल्हाप्रमुख दत्तात्रय गणेशकर यांनी केली.केंद्रात आणि राज्यात भाजपचे सरकार असताना व महाराष्ट्रात मिंदे सरकार आल्यापासूनच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे.




आरोपींना कायद्याची भीती राहिलेली नाही. हा खटला जलदगती न्यायालयात चालवून नराधमाला फाशी द्यावी, अशी मागणी दत्तात्रय वानकर यांनी केली. यावेळी उपजिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण, लहू गायकवाड, अस्मिता गायकवाड, विजय पुकाळे, आवा सावंत, पूजा खंदारे, सुरेश शिंदे,अनिल जाधव, सुरेश जगताप,ऋषी दोरकर, बाबू दोरकर, अजय पुकाळे, सोमनाथ बंदपट्टे,कृष्णा सुरवसे, अमोल भोसले, बाळासाहेब पवार आदी उपस्थित होते.

# पिक विम्याचा वैयक्तिक अर्ज भरलेल्या शेतकऱ्यांचे नुकसान भरपाईचे पैसे विमा कंपनीने त्वरित द्यावेत -जिल्हाधिकारी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्रधानमंत्री पिक विमा योजना 2023 अंतर्गत वैयक्तिक अर्ज (इंटीमेशन) भरलेल्या शेतकऱ्यांची संख्या 1 लाख 13 हजार 563 इतकी असून या अंतर्गत पीक विम्यासाठी पात्र होणाऱ्या शेतकऱ्यांना पीक विमा कंपनीने नुकसान भरपाईची रक्कम त्वरित अदा करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित प्रधानमंत्री पिक विमा योजना जिल्हास्तरीय आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद बोलत होते.

यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने, कृषी उपसंचालक राजकुमार मोरे, कृषी विभागाचे तंत्र अधिकारी राहुल



गायकवाड, ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीचे प्रतिनिधी तसेच पूवीर्चे भारतीय कृषी विमा कंपनीचे प्रतिनिधी बाळासाहेब गोपाळ व अन्य सदस्य उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीने प्रधानमंत्री पिक विमा योजना 2023 अंतर्गत वैयक्तिक अर्ज (इंटीमेशन) भरलेल्या शेतकऱ्यांची संख्या खूप मोठी आहे. यापैकी 25 हजार 71 शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम आदा झालेली आहे. तरी उर्वरित शेतकऱ्यांची रक्कम शासन निर्णयात नमूद तरतुदीच्या अधीन राहून जेवढ्या शेतकऱ्यांचे शक्य आहेत त्या सर्व पात्र शेतकऱ्यांचे पीक विम्याचे पैसे त्वरित देण्याबाबतची कार्यवाही करावी. विमा कंपनीने बऱ्याच ठिकाणी पीक नुकसानीचा पंचनामा न करता शेतकऱ्यांचे नुकसान भरपाई चे पैसे नाकारलेले आहेत हे चुकीचे असून विमा कंपनीने नियमाप्रमाणे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी असे त्यांनी निर्देशित केले. कृषी विभागाने पिक विमा कंपनीच्या अहवालाची व्यवस्थित माहिती घेऊन आजच्या बैठकीच्या संदर्भ देऊन ज्या शेतकऱ्यांना या अंतर्गत नुकसान भरपाई मिळू शकते त्या सर्वांना नुकसान भरपाई मिळण्याबाबतचा अहवाल विमा कंपनीला पाठवावा व विमा कंपनीने त्यांच्या स्तरावरून याबाबत पुढील कारवाई करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळेल यासाठी सकारात्मक रहावे असेही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सूचित केले.

प्रारंभी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. गावसाने यांनी प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप हंगाम 2023 नुकसान भरपाईची सद्यस्थिती बैठकीत मांडली. यामध्ये हंगाम मध्य प्रतिकूल परिस्थिती नुकसान भरपाई वाटप हे जिल्ह्यातील 1 लाख 92 हजार 750 शेतकऱ्यांना 115 कोटी झालेले असून 13 हजार 533 शेतकऱ्यांना 93 लाख रुपये मिळणे बाकी असल्याचे सांगितले. तसेच स्थानिक नैसर्गिक आपत्ती वैयक्तिक पंचनामे आधारित नुकसान भरपाई 25 हजार 954 शेतकऱ्यांची झालेली होती यानुसार 24 हजार 772 शेतकऱ्यांना 24 कोटी 33 लाखाचे वाटप झाले. त्याप्रमाणेच

काढणी पश्चात नुकसानी अंतर्गत 21 हजार 384 पूर्व सूचना पैकी 14 हजार ,454 पंचनामे पूर्ण झाली असून त्यापैकी 3313 शेतकऱ्यांना आज अखेर एक कोटी 96 लाखाचा निधी वितरित करण्यात आल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

# ग्रंथालयास स्पर्धा परिक्षा पुस्तकाचा सेट व नविन ब्ल्यूटुथ स्पीकर सेट भेट

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पूर्व विभागातील २५ पूर्ण झालेली संस्था तेलुगू भाषा अभिवृध्दी ग्रंथालयम्‌ या वाचनालयाच्या वतीने बालाजी अमाईन्स लि.यांच्याकडे स्पर्धा परिक्षेच्या पुस्तकांची मागणी केली. बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक डी. राम रेड्डी यांनी व संचालक मंडळाने या ग्रंथालयास स्पर्धा परिक्षा पुस्तकाचा सेट व नविन ब्ल्यूटुथ स्पीकर सेट 'मंगळवार दि २० रोजी भेट दिला.या कार्यक्रमास तेलुगू भाषा अभिवृध्दी ग्रंथालयमचे चेअरमन मल्लिकार्जुन कमटम, संचालक



श्रीनिवास यंनगंदुल, तिपण्णा गणेरी, सचिव प्रभाकर भिमनाध, सहसचिव तसेच संस्थेचे सभासद उपस्थित होते.याप्रसंगी तेलुगू भाषा अभिवृध्दी ग्रंथालयमचे चेअरमन मल्लिकार्जुन कमटम यांनी बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक डी.राम रेड्डी व संचालक मंडळाचे आभार मानले. यावेळी बालाजी अमाईन्स चे दत्तप्रसाद सांजेकर, बसवराज अंटद हे उपस्थित होते.

# ग्रंथ आणि ग्रंथालय हे शाश्वत असून वाचनसंस्कृती ही ग्रंथालयांमुळेच टिकून

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** समाजमाध्यमांचा वाढता वापर, बदललेली जीवनशैली यामध्येसुद्धा ग्रंथालयाचे महत्त्व अबाधित आहे. ग्रंथ आणि ग्रंथालय हे शाश्वत असून वाचनसंस्कृती ही ग्रंथालयांमुळेच टिकून आहे. वाचनसंस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी ग्रंथालयांचा गुणात्मक विकास आवश्यक आहे, असे प्रतिपादन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना दिला जाणारा डॉ.बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय पुरस्कार व ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ता व सेवक यांना डॉ. एस. आर. रंगनाथन ग्रंथमित्र पुरस्कार प्रदान सोहळा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पाटील यांच्या हस्ते पाटकर सभागृह,



एसएनडीटी महिला विद्यापीठ येथे झाला.यावेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पाटील म्हणाले, ग्रंथालयांना आर्थिक सहाय्य योग्य पद्धतीने मिळणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे जर नवीन पिढी ग्रंथालयाकडे जात नसेल तर नवनवीन प्रयोग करून त्यांच्यापर्यंत ग्रंथालय आणणे गरजेचे आहे.फिरते वाचनालय, ई-वाचनालय अशा विविध पद्धतीने लोकांपर्यंत वाचनाची आवड निर्माण व्हावी,यासाठी ग्रंथालय संचालनालय काम करीत आहे. सर्वांनी मिळून ग्रंथालय,वाचनालयाचा आत्मा समजून घेऊन ग्रंथालयाची चळवळ विकसित करण्याची गरज आहे.प्रधान सचिव रस्तोगी म्हणाले की, महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळ खूप मोठी आहे. ही चळवळ बळकट होऊन वाचकांना अधिक चांगली सेवा चळवळीमार्फत देण्यात यावी. ग्रंथालयाच्या आस्थापनांनी ग्रंथालयाचा वापर वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत. यातही आधुनिक तंत्रज्ञान, नवीन पिढीची आवड ओळखून काम करावे. पुस्तके सहज उपलब्ध होण्यासाठी डिजिटल तसेच ई-लायब्ररी करण्याकडे अधिक भर देण्यात यावा. पुस्तके,सोयीसुविधा आणि परिसर यात सुधारणा कराव्यात, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# 'नको तुमची लाडकी बहीण योजना, आम्हाला सुरक्षा द्या'



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** बदलापूर येथे अल्पवयीन मुलींवर अत्याचार झाल्याच्या निषेधार्थ सोलापूर राष्ट्रवादी कॉंग्रेस महिला आघाडी शरदचंद्र पवार गटाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात करून या घटनेतील गुन्हेगारास भर चौकात फाशीची शिक्षा देण्याची मागणी करण्यात आली. 'नको तुमची लाडकी बहीण योजना, आम्हाला सुरक्षा द्या' अशी घोषणा यावेळी आंदोलकांनी दिली. फडणवीस सरकारचा निषेध असो, मोदी सरकार हाय, हाय, आरोपीस फाशीची शिक्षा झालीच पाहिजे,गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा या आंदोलकांच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. राज्यामध्ये भरदिवसा कायदा व सुव्यवस्था बिघडलेली आहे. असे कृत्य होऊ नये म्हणून राज्य सरकारने त्या नराधमास कडक शिक्षा करावी, अशी मागणी यावेळी आंदोलकांनी केली. सुनीता रोटे, लता फुटाणे,वंदना भिसे, नसिमा शेतसंधी, महिलाध्यक्षा सुनीता गायकवाड, गौरा कोरे, युवती अध्यक्षा प्रतीक्षा चव्हाण, सारिका नारायणकर,प्रेमलता कांबळे, उमा केत, गुलशन जमादार, नागणे, व्ही. डी. गायकवाड, प्रमोद भवाळ आदी आंदोलनात सहभागी झाले होते.

# सदगुरु श्री संत बाळूमामा यांच्या ५८ व्या पुण्यतिथि निमित्त भव्य सप्ताह कार्यक्रम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्री संत बाळूमामा मंदिर बेलाटि ता. उत्तर सोलापुर येथे दिनांक शनिवार १७ रोजी शांताराम पाटिल (ओविकार) यांचे भजन व कीर्तनाचा सोहळा पार पडला नंतर अनेक भक्तानी महाप्रसादाचा लाम घेतला. रविवार १८ रोजी मेंढि पूजन व दर्शन, महाप्रसाद भावीकांनी याचा लाभ घेतला सायंकाळी 6 वाजता भारतीय हिंदराज सेना चे संस्थापक अध्यक्ष धारासिंह राजपूत यांच्या हस्ते बाळू मामा व ईतर देवांची आरती करण्यात आली यावेळस भावीक मोठया प्रमाणात होते .या सवानीं महाप्रसाद चा लाभ घेतला. सोमवार 19 रोजी मारुति काळे (ओवीकार)




यांचा भजन कीर्तन सोहळा पार पडला. नंतर भावीकांनि महाप्रसादाचा लाभ घेतला सायंकाळी सहा वाजता भागवत वैद यांच्या हस्ते पूजा करून याचा घोगडे नारळ देवून सत्कार करण्यात आला नंतर महाप्रसादाचा भावीकांनी लाभ घेतला. आयोजित समिती श्रीराम पाटिल, धारासिंह राजपूत, रामा काळे, सुनील काटकर, विजय वाघमोडे, अण्णापा घटकूडे, शेडगे सर, शिवपंडीत पाटिल, सूनीता पाटिल, सूगंधा गुजरे, समर्थ गूजरे, यांनी परिश्रम घेतले यावेळेस रामा काळे, दता शोकले, श्रींमत बंडगे, अंबादास घोघरे, अर्जुन देवकते, शामराव पाटिल, सुभाष मोहिते काशिनाथ माशाळ, नीरापा शेंडगे, करापा डोनगे व मोठया प्रमाणात भाविक उपस्थित होते.

# सोलापूर शहर कॉंग्रेसच्या चिमुकल्या मुलींसोबत आणि कोलकाता येथे महिला डॉक्टरवरील अत्याचारवर महिलांचा निषेध

**सोलापूर(कटूसत्य वृत्त):-** बदलापूर येथे चिमुकल्या मुलींसोबत आणि कोलकाता येथे महिला डॉक्टरवरील अत्याचार व तिच्या हत्येचा निषेध करण्यासाठी सोलापूर शहर महिला कॉंग्रेसच्या अध्यक्षा प्रमिला तुपलवंडे यांच्या नेतृत्वाखाली महिला कॉंग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी कॉंग्रेस भवन येथे निदर्शने केली. या प्रकरणातील आरोपींना फाशी द्या, अशी मागणी यावेळी करण्या आली.खा. प्रणिती शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हे आंदोलन करण्यात आले. आंदोलनानंतर तहसीलदार दिनेश पारगे यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले.



राज्यातील महायुती सरकारच्या निष्क्रियतेपणामुळे देशात आणि महाराष्ट्रात महिला अत्याचाराच्या घटना वाढतच चाललेल्या आहेत. देश आणि महाराष्ट्रातल्या महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न वेशीवर टांगला आहे. त्यामुळे केंद्रातील एनडीए सरकार आणि राज्यातील महायुती सरकारविरुध्द जनतेत प्रचंड रोष निर्माण होऊन जनता रस्त्यावर उतरत आहे. महायुती सरकार महिलांच्या सुरक्षिततेची हमी देऊ शकत नाही. त्यामुळे मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री, गृहमंत्री, शिक्षणमंत्री यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली.